स्पे.के.नं.१७ /२०२५

माणगाव येथील मे.विशेष न्यायाधीश तथा जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे न्यायालयात

सरकार फीर्यादी

विरुद्ध

श्रीम.अपर्णा उर्फ दिप्ती दिनेश शेवाळे आरोपी

**यांत आरोपी तर्फे विनंती अर्ज की,**

१) सदरकामी आरोपी यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहीता कलम १८९(२), ११५(२), ३५१(३) सह अनुसुचित जाती–जमाती प्रतिबंधक कायदा कलम ३(१)(r), ३(१)(s) , ३(१)(za)(A), ३(१)(va) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाकामी आरोपी हे चौकशी अधिकाऱ्याने नोटीस दिल्यानंतर चौकशीकामी हजर होवुन आरोपी यांनी या केसकामी सरकार पक्षास संपुर्णपणे सहकार्य केलेले आहे. आरोपी व मुळ फीर्यादी यांचे दरम्यान शेतजमीन मिळकतीबाबत दिवाणी स्वरुपाचा वाद असुन याबाबत मे.दिवाणी न्यायाधीश क.स्तर पाली यांचे न्यायालयात १५/२०२० दाखल करण्यात आलेले आहे. या दिवाणी वादामधुन आरोपी यांच्या विरुद्ध फीर्याद दाखल करण्यात आली असुन आरोपी यांना सदरचा गुन्हा मान्य व कबुल नाही.

२) आरोपी यांनी पोलीसांना गुन्हयाच्या तपासकामामध्ये संपुर्ण सहकार्य केल्यामुळे पोलीसांनी आरोपींना गुन्हयाकामी अटक केले नाही व संपुर्ण तपासाच्या कालावधीमध्ये आरोपींना अटक करण्यात आलेली नाही. आरोपींनी गुन्हयाच्या तपासाकामी संपुर्ण सहकार्य केल्यामुळे यांचे विरुद्ध तपास पुर्ण करुन पोलीसांमार्फत दोषारोपपत्र या मे.कोर्टात दाखल करण्यात आलेले आहे व त्यावेळीही आरोपींना दोषारोपपत्रासोबत हजर करण्यात आलेले नाही. त्यानंतर या मे. कोर्टामार्फत आरोपी यांना आरोपी समन्स काढण्यात आले असुन

आरोपी यांचेवर आरोपी समन्सची बजावणी झाल्यानंतर आरोपी आजरोजी न्यायालयात उपस्थित झालेले आहे.

३) आरोपी यांना तपासाच्या संपुर्ण कालावधीमध्ये अटक केलेले नसल्यामुळे आरोपी समन्सप्रमाणे हजर होवुन लायक जामीन देण्यास कबुल आहेत. आरोपी यांनी दिलेल्या जामीन अर्जावर सरकारी पक्षांचे व फीर्यादीचे म्हणणे येण्यास कालावधी जाणार आहे. दरम्यानच्या कालावधीमध्ये आरोपी हे स्थानिक या मे.कोर्टाच्या कार्यकक्षेमध्ये राहणारे कायम रहीवासी असल्यामुळे आरोपी यांना अंतरीम जामीनावर मुक्त करण्यात येवुन त्यानंतर मुळ म्हणणे घेवुन अंतिम जामीन आदेशाबाबत निर्णय होण्यास विनंती आहे.

४) आरोपी मे.कोर्टाने नेमलेल्या तारखांना नियमितपणे हजर राहतील. तसेच केसचे काम चालविण्याकरीता संपुर्णपणे सहकार्य करतील. आरोपी हे साक्षीदारांवर कोणत्याही प्रकारे दबाव आणणार नाहीत.

५) आरोपी हे या मे.कोर्टाच्या स्थलसिमेत कायमस्वरुपी रहीवासी आहेत. मे.कोर्ट ज्या अटी व शर्तींवर आरोपींना जामीन मंजुर करेल त्या अटी व शर्तींचे आरोपी पुर्तता करतील. तसेच आरोपी यांची कोणत्याही प्रकारे गुन्हेगारी पार्श्वभुमी नाही अगर आरोपी यांच्या विरुद्ध या गुन्हयाखेरीज अन्य कोणतेही गुन्हे दाखल नाहीत. सदरचा गुन्हाही दिवाणी वादातुन चुकीच्या पद्धतीने आरोपी यांच्या विरुद्ध दाखल करण्यात आलेला आहे. या सर्व बाबींचा विचार करण्यात येवुन आरोपी यांना लायक जामीन मंजुर करण्यात यावा व दरम्यानच्या कालावधीमध्ये आरोपी यांची अंतरीम जामीनावर मुक्तता करण्यात यावी अशी मे.कोर्टास विनंती आहे.

५) अर्जास नियमानुसार स्टॅम्प दिलेला आहे.

-2-

On the contd. @ the usual conditions. As accused had not been arrested by I.O. and notice to appear before I.O. was issued. Till the service of the notice to the victim, the accused be released on interim bail on Rs.15000/- each.

-2-

-2- With surety in the like amount.

३

६) आरोपीची विनंती की,

१) आरोपी यांना दाखल गुन्हयामध्ये नियमित जामीन मंजुर करण्यात यावा व दरम्यानच्या कालावधीमध्ये आरोपी यांची अंतरीम जामीनावर मुक्तता करण्याचा आदेश करण्यात यावा.

येणेप्रमाणे विनंती आहे.

माणगाव

दिनांक ०४/१०/२०२५

O (Dt. 02/01/2026)

Heard both the sides. The interim bail was granted. No infringement of the same is reported. Accused were not arrested during the investigation. Informant opposed the appln. Charge-sheet is present. Accused appeared. Not just and necessary to send them to jail. Bail Appln. is allowed, on usual conditions. P.R.B. Rs. 15000/- each.

Shewale

आरोपी क्र १
श्रीम.अपर्णा उर्फ दिप्ती दिनेश शेवाळे

सुधीर विठ्ठल शेवाळे

आरोपी क्र २
सुधीर विठ्ठल शेवाळे

सुप्रिया सु शेवाळे

आरोपी क्र ३
मनिषा उर्फ सुप्रिया सुधीर शेवाळे

योगीता ध. शेवाळे

आरोपी क्र ४
योगिता धनेश शेवाळे

भा भा शेवाळे

आरोपी क्र ५
मंदा उर्फ भाग्यश्री भालचंद्र शेवाळे

आरोपीतर्फे वकील

Shewale

आरोपी क्र ६
दिनेश रघुनाथ शेवाळे